जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -३५४ दिनांक - ०३/०९/२०२४**

युनिट २ गुन्हे शाखा,पुणे शहर

## मोका गुन्हयातील पाहिजे आरोपी जेरंबद

पुणे शहर व पुणे ग्रामिण पोलीस स्टेशनचे हददीतील पाहिजे गंभीर गुन्हयातील आरोपीतांचा गुन्हे शाखा युनिट २ कडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे दिनांक ३१/०८/२०२४ रोजी शोध घेत असताना **पोलीस अंमलदार शंकर कुंभार व उज्वल मोकाशी** यांना बातमी मिळाली की,चाकण पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर क्रमांक १८६६/२०२२ भा.द.वि.क.३९५,३६५,३४१,३२३,५०६,आर्म ॲक्ट ४(२५) मधील पाहिजे आरोपी अरविंद सोनू घोलप हा रामटेकडी हडपसर परीसरात फिरत असलेबाबत खात्रीलायक माहिती मिळाली

सदर बाबत पोलीस निरीक्षक श्री.प्रताप मानकर,गुन्हे शाखा युनिट २ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी रामटेकडी हडपसर परिसरात अंध शाळेजवळुन महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी अन्वेय गंभीर गुन्हयातील पाहिजे आरोपीस ताब्यात घेतले.त्याचेकडे चौकशी करुन खात्री केली असता त्याचे नाव **अरविंद ऊर्फ सोनू नवनाथ घोलप वय ३२ रा.भवानी माता मंदिराजवळ रामटेकडी हडपसर पुणे** असे सांगुन चाकण पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर क्रमांक १८६६/२०२२ भा.द.वि.क.३९५,३६५,३४१,३२३,५०६,आर्म ॲक्ट ४(२५) व महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी अन्वये दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपी असलेबाबत सांगीतले. पुढील कायदेशीर कारवाई कामी चाकण पोलीस स्टेशनचे ताब्यात दिले आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री.अमितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त श्री.रंजनकुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री.निखिल पिंगळे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री.गणेश इंगळे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ कडील पोलीस निरीक्षक श्री.प्रताप मानकर, सहा.पोलीस निरीक्षक अमोल रसाळ,पोलीस अंमलदार संजय जाधव,शंकर नेवसे,उज्वल मोकाशी,शंकर कुंभार,निखिल जाधव व साधना ताम्हाणे या पथकाने केली आहे.